**जिल्हाधिकारी कार्यालय,धुळे** [ जिल्हास्तरीय वनहक्क समिती ]

सामूहिक वनहक्काच्या अंमलबजावणीसाठी तालुका व्यवस्थापकांची पदे भरणेसाठीची जाहिरात

दिनांक :-१५ फेब्रु. २०१८

जाहिरात क्र. ०१ / २०१८

महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.राज्यपा-२०१५/प्र.क्र.८६/ का-१६ दिनांक ३ मार्च,२०१६ नुसार अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ च्या अंतर्गत सामूहिक वनहक्काच्या अंमलबजावणीसाठी धुळे जिल्हयातील साक्री व शिरपूर तालुक्यात प्रत्येकी एक अशी तालुका व्यवस्थापकाची दोन पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने सहा महिन्यासाठी मानधन तत्वावर भरावयाची आहेत. यासाठी अर्हता धारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत.

पदाचे नांव :- **तालुका वनहक्क व्यवस्थापक**

शैक्षणिक पात्रता :- १. शासनमान्य विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदविधर

२. व्यवस्थापन पदव्यु-तर पदवी MBA / MPM / MSW यांना प्राधान्य राहील.

३. संगणकाचे ज्ञान आवश्यक MS-CIT (शासन मान्य प्रमाणपत्र)

मानधन :- ( Fiixed Component Honorarium ) रु. १६५००/- (मानधन रु. १५०००+प्रवासखर्च प्रतिमाहा .१५००/-)

तालुका व्यवस्थापक यांनी प्रतिमहा दहा गावाना भेटी देणे अपेक्षित असून

प्रतिभेट रु.१५०/- नुसार रु.१५००/- च्या मर्यादेत राहील.

भरती निवड पध्दती :- पात्र व योग्य उमेदवारांची [ Short Listed ] लेखी परीक्षा / मुलाखतीव्दारे ( walk-in-interview ) निवड करण्यांत येईल .

सदर पदांसाठी इच्छुक व अर्हताप्राप्त महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांकडून दिनांक 6 /३/२०१८ सायंकाळी **५-००** वाजेपावेतो **जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथे** अर्ज मागविण्यांत येत आहेत. अर्जाच्या लिफाफ्यावर पदाचे नाव लिहावे . मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार करणेत येणार नाही. इच्छुक उमेदवारांनी अर्जासोबत अर्हताप्राप्त कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडणे आवश्यक असून मुलाखतीच्या वेळी सदर कागदपत्रांच्या मूळ प्रती सादर करणे आवश्यक आहे. [ अर्जावर आपला संपूर्ण पत्ता ,फोटो , ईमेल आयडी व मो. न. आवश्यक आहे ]

तालुका वनहक्क व्यवस्थापक या पदाची जबाबदारी व कर्तव्ये, योजनेचे स्वरुप, योजनेचे निकष, इत्यादी बाबतची माहिती आदिवासी विकास विभागाचे दिनांक ३ मार्च २०१६ च्या शासन निर्णयात सविस्तरपणे देण्यांत आली असून सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्रमांक **२०१६०३०३१५५६४२३९२४** असा आहे.

**अध्यक्ष,**

जिल्हास्तरीय वनहक्क समिती तथा

**जिल्हाधिकारी,धुळे**